# प्रेसनोट

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**
**पुणे-४११००६**

**जा.क्र./पोउआ/वाह/नियो/३५१५/२०२४** **दिनांक - ११/०५/२०२४**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने २१५ कसबा विधानसभा मतदार संघाचे निवडणुकीचे कामकाज गणेश कला क्रिडा केंद्र येथे सुरु आहे. नमुद ठिकाणावरुन मतदानाचे मतदारयंत्र व साहित्य वाटप करणार आहेत तसेच जमा देखील करणार आहेत. त्याकरिता मोठया प्रमाणावर बसेस व इतर वाहने हि गणेशकला क्रिडा केंद्रासमोर येणार असल्याने वाहतुकीत बदल करणे आवश्यक आहे.

त्याकरिता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी रोहिदास पवार, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर स्वारगेट वाहतुक विभागामध्ये दि. १२/०५/२०२४ चे ०६.०० ते १३.०० वा पर्यंत व दि.१३/०५/२०२४ चे १८.०० वा ते २४.०० वा.पर्यंत जेधे चौक ते बजाज पुतळा चौक दरम्यान वाहतुकीमध्ये खालीलप्रमाणे बदल करत आहे.

- ❖ **दि.१२/०५/२०२४ चे ०६.०० ते १३.०० वा दरम्यान व दि.१३/०५/२०२४ चे १८.०० वा ते २४.०० वा. दरम्यान जेधे चौक ते बजाज पुतळा चौक दरम्यान सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतुक आवश्यकतेनुसार बंद राहिल.**

**पर्यायी मार्ग** :-

१) जेधे चौकामधुन - सावरकर चौक व पुरम चौकाकडे जाण्याकरिता वाहनचालकांनी जेधे चौकामधुन - व्होल्गाचौक, मित्रमंडळचौक, सावरकरचौक, पुरम चौकाकडे जावे.

२) सोलापुर रोडवरील जेधे अंडरपास बंद राहिल.

**पर्यायी मार्ग**

१) वरील प्रमाणे किंवा

२)वेगासेंटर चौक येथुन उजवीकडे घोरपडीपेठ मार्गे राष्ट्रभुषण चौक मार्गे इच्छित स्थळी जावे

**३) सातारा रोडवरुन पुरम चौकाकडे जाण्यासाठी जेधे उड्डाण पुलावरुन प्रवेश बंद राहील**

पर्यायी मार्ग - सातारा रोडवरुन व्होल्गा चौक, मित्रमंडळ चौक, सावरकर चौक पुरमचौक मार्गे जावे.

**(रोहिदास पवार)**
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक, पुणे शहर

**प्रति,**

**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी**,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - १

**प्रत :-**

**४) सहा.पोलीस आयुक्त, वाहतुक परिमंडळ १ पुणे शहर**

**५) पोलीस निरिक्षक**, प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) **प्रभारी अधिकरी**, स्वारगेट वाहतुक विभाग ,पुणे शहर.

४) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतुक शाखा पुणे शहर**

२/-सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रातून प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी. सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर/ ट्विटरवर अपलोड करावी.

५) **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतुक शाखा पुणे शहर**

२/-संबंधित विभागाचे प्रभारी अधिकरी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करून घेवून सादर करावा.

६) **मा.सहाय्यक अभियंता** (ट्रॅफिक प्लॅनिंग), म.न.पा. पुणे.

२/-सदर ठिकाणी वरील निर्बंधाप्रमाणे फलक बसविणेबाबतची कारवाई होणेस विनंती आहे.

**प्रति :- व्यवस्थापक**, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे

२/-सदरचा आदेश राजपत्रात प्रसिध्द करुन त्याच्या ५ प्रती इकडील कार्यालयात पाठविण्याची विनंती आहे.